**प्रेसनोट दिनांक २७/०६/२०१९**

**मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**बाहेरील राज्यातुन आलेल्या दिंडीमधील हरविलेल्या महिलेस सुखरुप नातेवाईकांच्या ताब्यात दिलेबाबत.**

---

दि.२६/०६/२०१९ रोजी मार्केटयार्ड पोलीस स्टेशन हद्दिमध्ये वारक-यांच्या दिंडया उतरलेल्या होत्या. बेळगावकडील एका दिंडीमधील महिला शारदा यलप्पा बेळगावी,वय अंदाजे ४० वर्षे रा.बेळगाव कर्नाटक ही दिंडीतुन एकटीच बाहेर फिरण्यास गेल्यामुळे तिची दिशाभुल झाल्याने तिला पुन्हा दिंडीकडे जाता आले नाही.ती कन्नड भाषीक असल्याने तिला मराठी येत नव्हती त्यामुळे तिचा संपर्क होत नव्हता.ती पोलीस स्टेशनच्या पार्किंगच्या बाकड्यावर अस्वस्थ बसली होती.तिला पाहुन पोलीस कर्मचारी हे त्या महिलेस विचारापुस करु लागले असता तिला काहिएक मराठी भाषा समजुन आली नाही.त्याठिकाणी एल.आय.बी.चे पोलीस शिपाई एस.व्ही.कोळी यांनी तिच्या कन्नड भाषेच्या ओळी कानावर पडल्याने त्यांनी त्या महिलेशी कन्नड भाषेत संवाद साधला असता त्या महिलेने सदर कर्मचा-यास तिची हकिकत सांगितली असता त्या महिलेने तिच्या जवळ असलेला कागदावर लिहलेला मोबाईल नंबर सदर कर्मचा-यास दिला असता त्यांनी तो सदर व्यक्तीला फोन करुन कन्नड भाषेतुन त्यांच्या बोलले असता सदर महिलेचा नाव पत्ता सांगितला असता तिच्या मुलाने सांगितले की ती माझी आई आहे.तिला तिथेच थांबवा व मला सांगा मी कोणत्या ठिकाणी येवु आम्ही सदर इसमास मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचा पत्ता सांगितला असता सदरचा इसम हा विस मिंटात पोलीस स्टेशनला आला असता आम्ही सदर माय लेकरांची भेट घडवुन त्या महिलेस तिच्या मुलाच्या ताब्यात सुखरुप दिले व तो मुलगा पुणे पोलीसांचे आभार मानुन त्याच्या आईला निघुन गेला.